म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय आ. वा.
दा. क्र. २०९५

# आगरकर चरित्र

IRBK-0102015
IRBK-0102015

पु. पां. गो

म. ग्रं. स. ठा.
विषय चरित्र-वाङ्मय
वा. नं.



# आगरकर चरित्र

IRBK-0102015
IRBK-0102015

—पु. पां. गोखले

म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्रवाङ्मय

30 SEP 1976

म. ग्रं. स. ठाणे

# आगरकर

## चरित्र

लेखक

**पु. पां. गोखले बी. ए.**

किंमत सहा आणे.

प्रकाशक:-

द. र. कोपर्डेकर

५२९ सदाशिव, पुणें २.

पुनर्मुद्रण : १९४४.

मुद्रक:-

अनंत कृष्ण कुलकर्णी

आनंद प्रिंटिंग प्रेस,

१८२ सोमवार, सातारा.

# आरंभींचें हितगुज.

## गोपाळ गणेश आगरकर—

हा एक थोर पुरुष होऊन गेला. तडफदार मुलांना लहानपणापासूनच ओळख होणें जरूर, असा पुरुष होता. आगरकरांचे बारकावे दाखविणारी निबंधमाला "आगरकरांशीं ओळख" या नांवानें मी तीन भागांत लिहिली आहे. तिचा पहिला भाग जुलै १९३९ त माझे चहाते बंधू रा. दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर यांनीं छापून मुलांच्या हातीं दिला. तो केसरीकारादि सुजाणांनीं वाखाणला, सरकारनें शाळांसाठीं मंजूर केला व शाळाचालकांनीं नि मुलांनीं गोडीनें आपलासा केला. तथापि बालनजरेनें अवघडपणाची थोडी कुरबूर मजकडे येतच होती. तिला नवीन छापणीचे वेळीं जागा ठेवावयाची नाहीं असें मी ठरवून टाकलें होतें. तसा योग येतांच, मुलांना हवें तसें आगरकर चरित्र मी बालगोपालांचे हातीं देत आहे "सहज बोलणें—हित अुपदेश" आगरकर चरिताचा हा उठाव मुलांना, शाळाचालकांना, सरकारला व सुजाणांना खास पसंत पडेल, असा मला भरंवसा आहे. हा भरंवसा यावयास पहिल्या आवृत्तीपासून जे जे अेक वा दुसरे परीनें मदतनीस झाले त्या सर्वांचा जिव्हाळा कारण आहे, हें मी विसरूं शकत नाहीं. ओघानेंच या मंडळीविषयीं कृतज्ञतेनें माझें मन भरुन येतें.

कऱ्हाड }

—पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

# —आमचें प्रकाशन—

| | | | रुपये |
|---|---|---|---|
| १ | तीन मुलें | साने गुरुजी | ॥ |
| २ | क्रांति | ” | ३ |
| ३ | स्त्रीजीवन १ व २ | ” | [illegible]॥ |
| ४ | मुलांसाठीं फुलें | ” | -। |
| ५ | राष्ट्रधर्म | ” | २ |
| ६ | समाजधर्म | ” | =॥ |
| ७ | समाधीवरील फुलें | वि. स. खांडेकर | २ |
| ८ | अत्तराचे दिवे | वि. वि. बोकील | =॥ |
| ९ | मंगळागौरीच्या रात्रीं | ” | =॥ |
| १० | मीना-नीना | ” | १ |
| ११ | आशा | ” | -॥ |
| १२ | कडू साखर | ग. ल. ठोकळ | =॥ |
| १३ | काव्यकलेचें अंतरंग | के. नारखेडे | २ |
| १४ | आगरकर | पु. पां. गोखले | [illegible]। |
| १५ | माईची माया | ना. धों. ताम्हनकर | १ |
| १६ | जागत्या छाया | अनंत काणेकर | २ |
| १७ | पांढरपेशांचें जग | श्री. ज. जोशी | =॥ |
| १८ | समाज आणि समाजसेवा | काका कालेलकर | १ |
| १९ | सुगंध | ग. ल. ठोकळ | [illegible] |
| २० | चौफुला | आचार्य भागवत | १ |
| २१ | बोलघेवड्या | ना. धों. ताम्हनकर | ॥ |

प्रकाशकः— दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर,
५२९, सदाशिव पुणें २.

# गोपाळ गणेश आगरकर

## वाडवडिलांचें वैभव—

गरूडावर बसलेले लक्ष्मी-नारायण. काळा दगड कोरून रमणीय घडविलेले होते ते! जेथें ते बसविले होते, तें अुन्चच्या अुन्च तटाचें देअूळ; चुना घालून बळकट केलेला तो तट; देवळांतला अैसपैस सभामंडप; रेखीव काम केलेलें देवळाचें अुन्च शिखर; शिखरभर कमानीकमानींचे मजले; कमानी-कमानींतून अुभे केलेले पौराणिक देखावे; देवळांत शिरावयाचा मोठा दर-वाजा व तेथलाच वरील बाजूचा नगारखाना—अशा थाटाचें देअूळ बांधून तें नीट रहावें व चालावें यासाठीं दरसाल पाअूणशें रुपये देणारी जमीन तिकडे लावून दिली असेल, तर तें, टेंभू गांवांत मोठें मानमरातबाचें लक्षण मानलें जाईल यात शंका कसली? कारण टेंभू बोलूनचालून कृष्णाकांठचें टिकली-एवढें गांव! आणि तेथें वरील वैभव. भरीला अुन्च तटबंदी असलेला राहता वाडा असेल, तर तें सारें जुळवून आणणाराची करणी नि वजन ठाक-ठिकीचें आहे असें धरून चालावयास बिलकूल हरकत नाहीं!

होय, अगदी हेंच वैभव टेंभू येथें बच्चाजीपंत आगरकरांचें होतें. यांचे अगोदर कोण वासिष्टगोत्री दातार रत्नागिरी जिल्ह्यांतील आगरी सोडून काय हिशोबीं सातारा जिल्ह्यांतील टेंभूस आगरकर हें नवें आडनांव धारण करून तळ देअून राहिले, हें कांहीं फारसें माहीत नाहीं. पण टेंभूंत ही आगर-कर मंडळी मोठी सालस अशीं गणलीं जात; आणि बच्चाजीपंतांचें वैभव कुळाचा सालसपणा खुलवील असेंच होतें.

बच्चाजीपंतांचे चिरंजीव विष्णुपंत यांनीं आपल्या वडिलांचा जामा-निमा जेमतेम राखला. विष्णुपंतांच्या वडील चिरंजिवांनीं— लखुनानांनीं कारकुनीचें काटेतोल काम करून राम राखावयाची आटोकाट खटपट केली. पण वारेवेगानें पळणारें वैभव हाताच्या अडसरीनें कसें अडवितां येणार?

## आअी-वडील—

आपले धाकटे भाअू गणूअप्पा यांचा विवाह लखुनानांनींच करून दिला होता. पण गणपतराव अगदींच "आळसाचा आसरा." अुघडच, आळशामुळें वैभवानें काढता पाय घेतला. अेवढा अेक कमीपणा सोडला तर गणूअप्पा व सरस्वतीकाकू हें आगरकर-जोडपें निखालस सुखी होतें. दोघांचा

जीव अेकमेकांवर जडला होता. अुभयता सरळ व देवभोळीं होतीं. देवाची पूजा-सेवा करावी अगर देवसेवेचीं साधनें जुळवीत-जमवीत असावें! जुनें वळण साधून गणुअप्पांना संथा मिळाली होती व थोडीफार संस्कृतची ओळखही झाली होती. या पुंजीवर ते कधीं पुराण सांगत तर कधीं कधीं कथाही करीत.

सरस्वतीकाकू तर सहजासहजी देवासंबंधानें गाणींही रचीत. टेंभू गांवांतीलच कशाला? आजूबाजूस देखील गांवागांवांतून काकूंचीं तीं गाणीं बायकांना तोंडपाठ असत. काकूमागेंदेखील तीं गाणीं कितीतरी दिवस ऐकावयाला मिळत. काकूंचें अेक सफाईदार गाणें कऱ्हाडच्या कृष्णाबाईसंबंधानें आहे, तें थोडें असें:—

> **अैका कृष्णाबाअीचें स्तवन ॥ धृ ॥**
> **रत्नखचित सिंहासन**
> **दश भुजांवरी ध्यान।**
> **पायीं साखल्या पैंजण**
> **शुक्रवारीं हो पूजन ॥**
> **हस्तीं त्रिशूळ घेअून**
> **दैत्य मर्दन केला तिनं ॥ १ ॥**

पण नुसतीं गाणीं रचून काकूंचें समाधान कोठें होतें? देवसेवेसाठीं वाटेल तें सोडायला काकू नेहमीं तयार असत. अेक अुदाहरण असें. लक्ष्मी-नारायणाचें देवळांतील सभामंडप मोडकळीस आला होता, तो नीट करावा असें काकू व अप्पा या दोघांनाही वाटे. पण गरीबींत मनोरथ हाकून काय अुपयोग? अखेर अेक दिवशीं मंडपाचें काम पुरें करावें यासाठीं काकूंनीं दोनही हातांतील पाटली काढून दिली. सात तोळे सोनें होतें तें. काकूंनीं तें पतिराजांचे हातीं दिलें व मंडपाची नवीन अुभारणी झाली.

**गोपाळाचें बालपण—**

काकूंना सात मुलें झालीं. पण दर खेपेस बाळंतपण माहेरीं. सासरची गरीबी हें तर कारण खरेंच! पण जीवाभावाची आई बोलावणें धाडी हेंही खरें. काकूंचें माहेर कऱ्हाडास भागवताकडे. तेथें १८५६ सालीं काकूंना जो कुलदीपक मुलगा झाला तोच गोपाळ गणेश आगरकर होय.

गोपाळ लहानाचा मोठा झाला तो देखील आजोळींच. बोबडे बोलत असतां आणि रांगत पळत असतां जेवढी लडिवाळ चिमणाई गोपाळानें वडिलांचे येथें टेंभूस घालविली असेल तेवढीच बाकी पुढें फारच ! थोडा काळ टेंभुचा व गोपाळाचा संबंध आला. खरें पाहिलें तर धूळपाटीवर गिरगटावयाला सुरवात करावयाचें वय हे कांहीं आईची मांडी अजिबात न आठवावयाचें वय नाहीं. पण गरीबींत मावळतीला ही सकाळ होते असें सांगतात! टेंभूस शाळा नाहीं; मग जवळची सोय काढली. सोय जाणील तो सोयरा हें भागवतांनींच अुदाहरणानें दाखवून दिलें होतें. अुघडच भागवतांकडे गोपाळ राहिला. बरोबरीचा दत्तु मामा, क्रीडाकौतुकाची आजी आणि कऱ्हाड टेंभूपासून फार दूर नाहीं ! अशा सोयीमुळेंच बाळ गोपाळाला आईबापांचा विरह जाणवला नाहीं.

## तीन बुकें—

दत्तु भागवत आणि गोपाळ आगरकर हे लाडके मामाभाचे एके ठिकाणीं शिकू लागले. "बारा वर्सांवेरी अिंग्रजीची तीन बुकें झालीं." पण नुसतें बुक अेके बुक करून नाहीं! शाळेचे हेडमास्तर रा. नारायण मनोहर रोंघे मोठे हुशार नि मेहनती. हसत खेळत, गमतो जमतीनें मुलाना अभ्यासाशीं कसें एकरूप करावें, ही कला ते चांगली जाणत. ते विनोदानें प्रश्न विचारीत आणि चिमखडा गोपाळ हुशारीनें व विनोदानेंच उत्तर देअून कसास उतरे. यामुळें रोंघे यांचा व इतर शिक्षकांचाही लोभ बहाल असे. पण हेंच काय झालें ? शाळेबाहेरही गोपाळाची चलाखी किरण टाकू लागली. या काळीं कऱ्हाडास नागपूरकर नावाचे मुन्सफ होते. अधिकार असूनही माणूस मोठा अुदार व विद्याप्रेमी. दर रविवारीं मुलांना कांहीं विषय देअुन निबंध लिहावयास सांगावयाचे व चार लोकांसमोर असे निबंध वाचवुन मुलांना सभाधीटपणाचे पाठ आणि उत्तम निबंधाला दोन रुपये बक्षीस द्यावयाचें, असा नागपूरकरांनी पायंडा पाडला होता. अशा संधीचा फायदा गोपाळसारखा मुलगा घेणार नाहीं कसा ? झोंपी गेलेला महाराष्ट्र पुढें जी लेखणी विवेकवादाची टोचणी लावून जागा करू शकली, ती अशा संधीस चुरचुरू चालू लागली असली, तर नवल कसलें ? गोपाळानें निबध लिहिले व बक्षिसेंही पटकावलीं. एकदा तर निबधातील ओज पाहून जमलेली मंडळी

गोपाळाचे अतिशय गौरवे गाऊं लागली. तरी या कौतुकात एक विसंवादी सूर निघाला. मामलेदार कृष्णाजी वासुदेव जोशी बोलले, " असला निबंध अशा लहान मुलांना कसा लिहितां येणार ? कोणाकडून तरी लिहून घेतला असेल, झालें ! " हा शेरा ऐकून गोपाळाचें मानी मन चवताळलें. तसा तो मुळात विनयशील होता. पण विनय झाला तरी "मेंगळटपणा" कां ? ताडकन् अुठून गोपाळनें मामलेदार साहेबांस सुनवलें- " साहेब, आपणास हवेंच असेल तर आपण पाहिजे तो निबंध आतां मला लिहावयास सांगा, अगदीं इथेंच इतकाच चांगला निबंध मी आपणास लिहून दाखवतो." आगरकरांचें अंगीं हयातभर दिसून आलेली विजेची तडफ अगदीं लहानपणापासून चमक मारीत असे ती अशी !

## खेळ—

पण नुसतें डोकें चालवूनच गोपाळाचें समाधान होत नसे. शाळेबाहेर बरोबरीचीं मुलें धिंगाणा घालावयास लागलीं तर तेथेंही गोपाळ पुढें असे. फुरसतीची, करमणुकीची, सुटीची वेळ सांपडावयाचा अवकाश कीं कृष्णा-कोयनांच्या वाळवंटात हा हुतूतू तरी घालावयाचा, संगमांत डुम्बत तरी बसावयाचा, नाहींतर चिंचेवर तरी चढलेला असावयाचा. हूडपणा कसा सदा हात जोडून गोपाळाच्या सेवेला हजर ! डोंगरदरी पायाखालीं तुडवून पहाटे लांब फिरून यावयाचें हाही अेक गोपाळाचा आवडीचा विषय होता. अशा संवयीनीं गोपाळाचें शरीर चांगलेंच काटक झालें होतें. या काटकपणाबरोबरच धिटाई व आवेश हे गुण गोपाळांत आले होते.

## वानरानें शेंडी धरली—

एकदां सारी बरोबरीची मंडळी अशींच नदीवरून परत येत असतां, चिंचेवर चढून मनमुराद चिंचा पाडावयाचें व खावयाचें ठरलें. पण झाडा-वर पाहतात तों काय ? चांगलीं पांचसहा वानरें ठाण मांडून बसलेलीं ! खालून मुलांनीं कितीही दगड मारले तरी निघेनात तीं तेथून ! बरें, वानरें असतां झाडावर चढावयाची छाती कोणाचीही होओना. अखेर आपण झाडावर चढूनच वानरांस पिटाळून लावावें, असें गोपाळनें ठरविलें. पण झाडावर चढतांच निराळा अनुभव आला. पळून जावयाचे अैवजीं एक दांडगा वानर गोपाळावरच चालून आला. पण हा पडला खंबीर गडी ! न

घाबरतां यानें केली वानराशीं झटापट सुरू ! शेवटीं वानरानें गोपाळची शेंडीच धरली. तरी याचे दोन हात चाललेच होते. अखेर तो वानरच कंटाळून निघून गेला. यावेळीं जर गोपाळ घाबरून गेला असता तर ? झाडावरून पडून कपाळमोक्षाचीच पाळी आली असती ! !

## शाळेला खीळ—

बाळगोपाळाचे दिवस असे हसत, खेळत, बागडत जात असतां, दैवाला तें खपलें नाहीं ! ! इंग्रजीची तीन बुकें पुरी होतांच कऱ्हाडचें शिक्षण संपलें; पुढें सोयच नाहीं; तसें गोपाळाचें शिक्षण खुन्टलें. बरोबरीचा दत्तुमामा पुणें येथें शिकावयास गेला. पण गोपाळाला तेथें कोण ठेवणार ? वडील मामा रामभाऊ भागवत यांचें कुटुम्ब मोठें ! यामुळें घरचा गाडा चालवून भाऊ नि भाचा या दोघांचा पुण्याचा खर्च चालविणें वकील असूनही रामभाऊंना अवघड होतें. उघडच, एवढें लहान वय असूनही वडील मामांचे मसलतीवरून गोपाळानें मुन्सफकोर्टांत उमेदवारी पत्करली. लागला मांडी मोडून खर्डे घासायला. पण समाधान ? ढीम नाहीं. बरोबरीची मंडळी पुढें दौडत चाललेली पाहून गोपाळचें मन तळमळलें, मेंदू खळबळला आणि शिक्षण पुढें चालू करावयास गोपाळाला एक तोड सुचली. रत्नागिरीस रा. वामन कृष्णाजी आगरकर " दिपुटी " होते. जरा लांबचे पण गोपाळाचे चुलत घराणेंच तें ! तिकडे जावयाचा गोपाळानें विचार केला. नागपूरकर मुन्सफांसह सगळ्यांना तो सांगितला. नागपूरकरांना तो इतका पसंत पडला कीं लगेच रोख पाऊणशें रुपये मदत देऊन त्यांनीं गोपाळास रत्नागिरी येथें रवाना केलें.

## परत जागेवर—

रत्नागिरीची मजल गोपाळानें पायींच मारली आणि वामनराव आगरकरांचें घर गांठलें. पण या अवघड जगांत आशेचा राहटीशीं मेळ कधींच बसत नाहीं. रत्नागिरीस गोपाळाला मृगजळाचा अनुभव आला. अगदीं सुखांत नाहीं तरी फारसे हाल न होतां आपलें शिक्षण होईल या आशेनें तो आला होता. पण कडू बोल आणि गरीबीची काम–उपस यापलिकडे गोपाळास कांहींच मिळालें नाहीं. पण अशानें तो लटपटला नाहीं. मनांत अेक समाधान होतें– आपलें शिक्षण चालू आहे. यामुळें निमूटपणें अपमान

सहन केले; पडलें तें काम रेटलें; माधुकरी मागितली; वार लावले व अशा रीतीनें दोन इयत्ता शिकून तो रिकामा झाला.

हरहर! पुढें दम छाटेना. मग गोपाळ टेकला फिरून कऱ्हाडास. दवाखान्यांत आतां बनला कंपाउंडर. पण अुगवला दिवस मावळे तरी गोपाळची रुखरुख बिलकुल कमी झाली नाहीं. समाधान कसें तें लाभेना! थोर माणसांचें असेंच असतें. ते परिस्थितीपुढें कधींच नमत नाहींत. मनाजोगा मोका येईतों ते सारखे झगडत असतात. गोपाळाची कंपाउंडरी हा अेक झगडाच होता. तशांतच अेक दिवस दवाखान्यांतील प्रेतफाड पाहून गोपाळाला किळस आली आणि फिरवली त्यानें कंपाउंडरीकडे पाठ! पण यानें काय झालें? शिक्षणाचें तूप नाहीं, नौकरीचें तेल नाहीं अन् रिकामपणाचें धुपाटणें-वरीक हातीं आलें. तथापि ही निराशा फार काळ टिकली नाहीं!!

## फिरून शाळा—

कारण लवकरच सदाशिवराव भागवतांची बदली वऱ्हाडांत झाली. ते लोकलफंड ओवरसीअर होते. गोपाळाचे मधले मामा ते. त्यांची मंडळी घेअून अकोल्यास जावयाचे होते. गोपाळानें ही संधि साधली आणि मामीलाही घरचीच सोबत झाली. १८७२ च्या जून महिन्यांत अकोला-हायस्कूलांत लागला गोपाळ शिकायला. पण दैवाला हें कोठून सहन होणार? दिली त्यानें चुणूक ठेवून? गोपाळच्या मामीची आई अंथरुणाला खिळली. शेवटची भेट दे, असा सांगावा लावून दिला तिनें. आईकडे लेक किती दिवस राहणार हें अशा कठीण काळीं कोण सांगणार? मग गोपाळास करून घालावें कोणी? सदाशिवरावांना फिरतीचें काम. यासाठीं फिरून कऱ्हाडास जावयास गोपाळास सांगितलें त्यांनीं.

कऱ्हाड! कऱ्हाडचें नांव निघालें कीं भगीरथीनें केलेली गंगेची मनधरणी गोपाळास सुचावयाची! करितां, गोपाळानें आतां तिसराच पंथ काढला. अकोला हायस्कूलांतील विष्णु मोरेश्वर महाजनींची शिफारस घेअून पुण्यास कांहीं सोय होते कां पाहवी असा मनसुबा केला. पण पुण्यास कांहींच सोय लागेना. तसा गोपाळ परतला व गाठलें त्यानें अकोला!!

## प्रवेश-परीक्षा झाली—

पण तेथील अडचण ? काढली महाजनींनीं. गोपाळ जातीचा जरा हूड व वडीलमंडळींचा मान ठेवण्यांत ढिला ! यामुळें सदाशिवरावांचा गोपाळा-वर राग ! तथापि महाजनींनीं रदबदली केली, तसे मामा कबूल झाले. गोपाळाला घरीं ठेवावयास. शिवाय, महाजनींनीं गोपाळासही उपदेश केला– " विनयानें वाग. घरीं ब्राह्मण नसता चुलीचीही आराधना कर. " या या अटींना गोपाळानें कबूली दिली अन् लागली गाडी रुळाला. ती तीन वर्षें संथ चालली आणि १८७५ त गोपाळाची विश्वविद्यालयीन प्रवेशपरीक्षा अुत्तम रीतीनें अुतरली.

## कॉलेजकडे—

पण ही कांहीं शिक्षणाची अखेरी नाहीं; आपण पदवीधर –अेम्. अे.– व्हावयाचें, याबाबत गोपाळाचा ठाम बेत परीक्षेचे अगोदरच झाला होता. अकोल्यास शिकत असतां, अेकदां कांहीं कामामुळें शाळेला बराच अुशीर झाला. तसे रा. महाजनी बोलले, " तुमच्या हातून काय होणार ? असेच रखडत पडायचें तुम्ही ! " महाजनींचे हे फटकारे बसताच गोपाळ ताडकन् म्हणाला, " आपणासारखा अेम्. अे. होईन तरच नांवाचा आगरकर ! " प्रवेशपरीक्षेच्या कितीतरी आधींची ही बाब. असा माणूस काय आपला बेत मागें घेईल ? अुघडच, गरीबींत मेटाकुटीनें शिक्षण घेणारा गोपाळ आतां नौकरीस लागावा, ही नातेवाअिकांची अपेक्षा. ती डावलून गोपाळरावांनीं– –हो, गोपाळरावच. आतां गोपाळ कसें म्हणावयाचें बरें ?— कॉलेजला जाण्याची तयारी केली. मोठेपणाची आंच अडथळाच मानीत नाहीं. हें पाहून महाजनी आदि गुरुमंडळींनीं आपापसांत जमा करून गोपाळरावांना साठ रुपयांची देणगी दिली. गुरुजींची अशी कृपा बरोबर घेअून गोपाळरावांनीं पुणें येथील डेक्कन कॉलेजांत नांव घातलें.

## अेकच सदरा—

नांव घातलें, पण जवळची पुन्जी किती दिवस तग धरणार ? याची जाणीव गोपाळरावांना होतीच. यामुळेंच अकोल्याच्या " वऱ्हाड समाचार" पत्रांत लेख लिहावयाचे कबूल करून संपादकाकडून दरमहा थोडी मदत

गोपाळरावांनीं मिळवली होती. पण दोन घोट पाणी मिळालें तर तेवढी वेळ निभते; तहानेचा तडाखा कांहीं कमी होत नाहीं. वऱ्हाड-समाचाराकडून सहा महिनेच मदत मिळाली; जवळची पुन्जी पारच ओसरूं लागली; काय करावें ? अशी चिंता वाढू लागली. अशांत गोपाळरावांच्या हातीं एक जाहिरात पडली. ती पुणें येथील "वक्तृत्वोत्तेजक सभे" ची होती. तिचा फायदा गोपाळरावांनीं घेतला: तयारी बेमालूम केली आणि चढाओढींत पहिलें चाळीस रुपयाचें बक्षीस मिळविलें. पुढें डेक्कन कॉलेजचें संमेलन आलें. "एकत्र हिंदू कुटूंब-पद्धतीपासून फायदे व तोटे" या विषयावर संमेलनानें निबंध मागवले होते. गोपाळरावांनीं या चढाओढीतही भाग घेतला. गोपाळरावांचा निबंध पहिला ठरला व पन्नास रुपयांचें बक्षीस मिळालें. अशा अवांतर मिळकतीशिवाय थोडीशी शिष्यवृत्तीही (ज्युनिअर स्कॉलरशिप) गोपाळरावांना पुढें मिळू लागली आणि अगोदरच डेक्कन कॉलेजांत शिकत असलेला दत्तुमामाही थोडा फार हातभार लावीत होताच. तथापि, हा महिना गेला, पुढचा कसा जाणार ? या सत्राची फी दिली, पुढें कशी भागवावयाची ? ही विवंचना गोपाळरावांचे मागची कधींच सुटली नाहीं. तरी गोपाळरावांनीं कोणाजवळ मदतीसाठीं तोंड उघडलें ? नांव कशाला ? जातीवंत पीळ तोंड वेंगाडत नसतो. अंगावर एकच सदरा, दुसरा करायला कूस सांपडेना. गोपाळरावांनीं ढकलले कितीतरी दिवस अेकाच सदऱ्यावर ! रात्रीच्या वेळी गुपचूप तो धुवावा आणि सकाळीं उठले कीं चढवावा अंगांत, अशी वहिवाट ठेवली. पहिल्या वर्षाच्या शेवटच्या परीक्षेचे वेळेस फीपुरतेही राणीछाप गोपाळरावांजवळ राहिले नाहीत. तसें, एक नाटकच लिहून पैसे अुभे करावयाचे, असें गोपाळरावांनीं ठरवलें. आगरकरांचा मानस तो. मांडी ठोकून 'मध्यान-दिवा' तेवत लागले गोपाळराव नाटक लिहावयाला ! पण कोठून तरी ही बातमी प्राध्यापक केरूनाना छत्र्यांच्या कानावर गेली. केरूनाना काय, परोपकाराचा अवतार. आपणच आगरकरांची परीक्षेची फी भरून, केरूनानांनी घेतले काढून गोपाळरावांचे हातून तें नाटक ! अशाच थाटांत शिक्षण चालून गोपाळराव १८७८ त बी. ए. झाले.

## दोहोंचे चार हात—

बी. ए. परीक्षेचे जरा अगोदरच गोपाळरावांचा विवाह झाला. तो काळ लक्षांत घेतला तर गोपाळराव जरा उशीराच "संसारांत पडले !" पण

ह्या गरीबीचा परिपाक होता. आरंभीं आरंभीं गोपाळरावांचें नांवच काढा-वयास कोणी मुलीचा बाप तयार नव्हता. पण आपला आपण बी. ए. ची मजल गांठणारा हा मुलगा पाहून पुढें पहिलें वारे बदललें !

असें झालें कीं, गोपाळरावांचे वडील गणुअप्पा यांचें उंब्रजास वरचेवर जाणें येणें असे. तेथील विनायकराव केळकर हे त्यांचे मामा. या केळकरांकडे रामभट फडके रहात असत. रामभटांचे चिरंजीव मोरभट. या बापलेकांचा नि गणुअप्पांचा दाट परिचय झालेला. या परिचयामुळेंच मोरभटांनीं आपली मुलगी अंबूताई गोपाळरावजीस देऊं केली. गणूअप्पाना तें अंक नवलच वाटलें ! पण, "बाकीचा विचारच करूं नका; मुलांकडे पाहूनच मुलगी पदरांत घ्या, म्हणतों आहे" असें मोरभटांनीं सांगितले तसें, अप्पांना रुकार देणें भाग पडलें; आणि कु. अंबूताई फडके सौ. यशोदाबाई आगरकर झाल्या. पण असे नुसते दोहोंचे चार हात करून झाले कीं सारी मिळवाव-याची जोड मिळवली असें गोपाळरावांस कधींच वाटलें नाहीं. उघडच, विवाहानंतर दोनच महिन्यांनीं ते बी. ए. ला बसले, पास झाले व एम्. ए. ची तयारी करूं लागले.

## पुढचे बेत—

अेम. अे. साठीं 'इतिहास आणि तत्त्वज्ञान' हा विषय गोपाळरावांनीं घेतला होता. बी. ए. झाल्यावर गोपाळरावांना डेक्कन कॉलेजांतच फेलो-शिप मिळाली होती. मग पैशाची काळजी जरा कमी झाली हें सहाजिकच नाहीं काय ? पण गोपाळराव शिकत होते ते कांहीं केवळ पोपटपंची करून पोटाची खळगी भरावी यासाठीं नाहीं.

> "आपला मुलगा मोठाल्या परीक्षा देत आहे, त्याला आतां मोठाल्या पगाराच्या नोकऱ्या मिळतील आणि आपले पांग फिटतील असें मोठाले मनोरथ आई, तूं करीत असशील. पण मी आतांच सांगून टाकतों कीं, विशेष संपत्तीची हांव न धरतां फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व काळ परहितार्थंच घालविण्याचें मी ठरवीत आहे."

असें पत्र गोपाळरावांनीं आईला लिहून टाकलें होतें. यावरून आपण पचनीं पाडलेला अभ्यास लोकांच्या सेवेसाठीं लावण्याची तळमळ आगरकरांना कशी लागली होती, हें अुघड होतें. गोपाळरावांचे गुरु महाजनी लिहितात:—

"विद्यार्थीदशेंत गरीबीशीं सतत झुन्ज देऊन, अलौकिक यश संपादून, आमरण गरीबींत आयुष्य कंठण्याचें ठरवून अध्यापन-वृत्तीनें पुराण ऋषींचें अनुकरण करून तीस अुज्वल करण्याचें व्रतच या निश्चयानें गोपाळराव घेत होते."

## टिळकांची जोड—

आपलें पुढील जीवन कसें काढावयाचें, हे आगकरांनीं वर सांगितलें तसें ठरवलें; याला कारणेंही होतीं. अेक तर शिकावयासाठीं आपण किती हाल काढले, याची खोल जाणीव होती. तीमुळें गरीबांची सोय करणें हें आपण शिक्षण घेतलें तें कारणीं लावतांना गोपाळरावांना कर्तव्यच वाटलें. दुसरें, गोपाळरावांनीं हेंही पाहिलें होतें कीं, लोकांना बाटवून ख्रिस्ती धर्मांत ओढण्यासाठीं मिशनरी लोक फारच तुटपुन्जा पगार घेअून काम करतात; मग आपलेच देशबांधव शहाणे करून ते जगांत छाती पुढें व मान ताठ करून चालावे, यासाठीं आपण तरी पोटापुरतें मिळवून कां राहूं नये? हाही विचार गोपाळरावांस सारखा येत होता. अशाच विचारसरणीचा अेक जोडीदार गोपाळरावांना या वेळीं भेटला, हेंही तिसरें कारण, गोपाळरावांनीं आखलेला आराखडा कायम होण्यांत आहेच. हा जोडीदार म्हणजे बाळ गंगाधर टिळक होय. गोपाळराव अेम्. अे. चे विषय वाचू लागले, त्याच सुमारास टिळक डेक्कन कॉलेजांत अेलेल्. बी. चा अभ्यास करण्यासाठीं येअून राहिले होते. मग सारखवट विचारांचे हे बाळगोपाळ झटकन जोडीदार जमले, हें सरळच नाहीं का? आपली मायभूमि परवश व अवनत आहे, ही रुखरुख दोघांनाही होती. आपला सामाजिक मागासलेपणा आणि जगाबरोबर पुढें न होतां, 'जुनें तें सोनें' मानीत राहणें हेंच सारे देशाची अवनती करते व परवशता कायम ठेवते असें आगरकरांचें मत! तर केवळ 'नवें ते हवें' असें करून आपण जगाबरोबर आहों असा अनेक वेळां माणसाला मोह होतो. तो जिंकला पाहिजे व जेवढें जुनें सोनेंच असेल तेवढें सांभाळून पुढें मजल मारली पाहिजे; पण राजकीय परवशता आहे तोंवर समाजांतील नादानी जाणार नाहीं, असें टिळकांचें मत!! सारांश, सामाजिक नादानीमुळें राजकीय परवशता, व राजकीय परवशतेमुळें सामाजिक नादानी असा हा घोळ असला तरी, देश शिरसलामत रहावयाचा असेल, तर लोकांना शहाणे करून सोडणें हाच तो घोळ टाळावयास अेक अुपाय असें टिळक–आगरकरांचें

अेकमत होतें. याच कारणानें ते लोकशिक्षणाचीं पावलें कशीं टाकावीं याचें चितन सारखें करूं लागले.

## चालून आलेली संधि—

कमीत कमी खर्चांत देशपोषक शिक्षण देणारी शाळा काढावी असें टिळक-आगरकरानी ठरविलें. आपला हा विचार रावसाहेब माधव गोविंद रानडे यांना एका पत्रानें टिळक आगरकरांनीं सादर केला. तो काळ रानडे यांचा छाप असलेला काळ होता. देशाची हरअेक बाजूनें भरभराट कशी होईल याची सारखी तळमळ रानडे यांना असे व ते होईल तेवढा पुढारीपणा घेअून हिंदुस्तानला नवें जीवन लाभेल अशी खटपट करीत. यामुळें अशा थोर पुरुषाचा पाठिंबा मिळावा, अशी भावना साहजिकच टिळक-आगरकरांना झाली. रानडे पण असे चमक नि चलाखी दाखविणारे तरुण देश-सेवेला लागावेत, असेंच मानणारे होते. अुघडच, टिळक आगरकरांची देश-सेवेची नवी दिशा समजतांच, रानडे सदर जोडगोळीची पाठ थोपटावयास पुढें झाले

आणि याच वेळेस सरकारी नोकरीला ठोकर मारून निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर पुणें येथें येअून दाखल झाले होते. अेकादी नवी शाळा काढावी असा विचार चिपळूणकरांनाही घेरीत होता. ही कुणकुण टिळक-आगरकरांना लागली. झोपलेला महाराष्ट्र खडबडून जागा करण्याची पुण्याई चिपळूणकरांची लेखणी जोडून बसली होती; इतकी कीं मराठी भाषेचे शिवाजी असाच चिपळूणकरांचा लौकिक होता. टिळक-आगरकरांना-ही यामुळेंच नितांत आदर. भरीला, आगरकर-चिपळूणकरांचा अगोदरचा थोडा परिचय. कांहीं दिवसांखालीं, आपण लिहिलेला अेक राजकीय निबंध आगरकरांनीं निबंधमालाकारांना नेअून दाखवला होता व तो त्यांना पसंत ही पडला होता. अशी थोडी ओळख पटली होती; तरी चिपळूणकरांनाच आपण जाअून मिळावें अशी ओढ टिळक आगरकरांना लागणें अगदीं सहज आहे. ओढीसारखे टिळक-आगरकर गेले आणि चिपळुणकरांनीही ताबड-तोब सहकार दिला. यावेळीं टिळक-आगरकरांविषयी चिपळूणकरांच्या काय भावना होत्या, तें त्यांनीं आपले बंधूस लिहिलेल्या पत्रावरून उघड होतें.

चिपळूणकर लिहितातः--

"टिळक आगरकर इत्यादीनीं आपण होऊन मजकडे [ शाळा काढण्याचा ] माझ्या धाडसांत सामील होण्याचे स्वतःच्या खुषीनें कबूल केलें आहे. ता. १ जानेवारी हा दिवस आमचें निशाण उभारण्याला आम्ही मुक्रर केला आहे. अशा तोफखान्यापुढें [ सरकारी ] हायस्कूल किती वेळ टिकाव धरणार?"

## ठेंच लागली—

तारीख १ जानेवारी १८८० रोजीं "न्यू अिंग्लिश स्कूल" या नांवानें शाळा सुरू झाली. पहिलाच दिवस असूनही शाळेचा पट दीडशें मुलांची हजेरी दाखवीत होता. तीन महिने गेले आणि शाळेंत पांचशेंहून अधिक मुलें येअू लागलीं. पण अगोदर ठरलें होतें, तसे आगरकर सुरवातीपासून शाळेस मिळूं शकले नाहींत. कारण आगरकरांना या खेपेस अेम्. ए. परीक्षेंत अपयश आलें होतें. बेत केला तसें अेम्. ए. न होणें, आगरकरांना परवडणारें नाहीं हें जोडीदार सहकारीही जाणित होते. मग, आगरकरांनीं साहजिकच एक वर्ष अभ्यास केला. पुढील सालीं एम्. ए. होतांच न्यू इंग्लिश स्कूलला न्हाअू माखूं घालावयास ते आले.

## केसरीचा संचार—

शाळेची चांगली भरभराट होअूं लागली पण सबंध समाजाला खडबडून जागे करून, आपण कोण होतों, कसे होतों, आज आपली दशा काय आहे, आपण कसे वागतों, खरोखर कसें वागावयास पाहिजे, याचें वळण लावलें तरच खरेंखुरे राष्ट्रीय शिक्षण आपण देअूं शकलों असें होओील, असें चिपळूणकर, टिळक, आगरकरादि न्यू अिंग्लिश स्कूलच्या चालक मंडळींना ठामपणें वाटत होतें. सहज, समाचारपत्र काढावेंसें या मंडळीस वाटलें आणि तसा खटाटोप ते करूं लागले. एक जुना छापखाना हेरून लगेच सौदाही ठरविण्यांत आला. रातोरात आपले जागेंत आणून तो छापखाना मंडळींनीं उभाही केला. मोरोबादादांचा वाडा बुधवारांत आहे, तेथें थाटलेला हा छापखाना आर्यभूषण या नावानें चालूं झाला. त्यांत रविवार ता. २ जानेवारी रोजीं मराठा हे इंग्रजी व ४ जानेवारी रोजीं केसरी हें समाचारपत्र न्यू स्कूलच्या मंडळीनीं सुरू केलें. मराठा टिळक संपादित व केसरी आगरकर. ठरलेलें धोरण सांभाळून आपापली सवड पाहून सारीच मंडळी या दोनही

पत्रांतून आरंभीं आरंभीं लिहीत. नवीन युगाची नौबत बहुजन समाजाला केसरीनेंच ऐकवली. राजकीय, सामाजिक, वैयक्तिक, कसला का अन्याय असेना, तो सहन न करतां अन्याय करणाराचा खरपूस समाचार घेणें केसरीनें आरंभिलें. यामुळें महाराष्ट्राचा कानाकोपरा केसरीचा आवाज ऐकून राहिला यांत अनपेक्षित कांहीं नाहीं. केसरींतील विषयांची विविधता, ताजे-पणाची खुमारी, भाषेची सजावट यामुळें लोकांचा कलिजा होऊन बसणें केसरीला अेका सालच्या अवधींत हातचा मळ होअून बसलें.

## डोंगरीची शिक्षा—

खरें; पण अन्याय करणारावर तुटून पडावयाचें सोपें नाहीं. अन्याय करणारा विरोधाला उभा राहतो. १८८१ चे अखेरीस केसरीलाही तें गंडांतर आलेंच. कोल्हापूर प्रकरण या नांवानें तें लोकांस परिचित आहे. कोल्हापूरचे छत्रपति राजाराम महाराज १८७१ त वारले. त्यांनीं मांडीवर घेतलेले चिरंजीव शिवाजीराव महाराज १८७९ त आक्टोबरला राजकोटहून आपलें शिक्षण पुरें करून आले. अगोदरपासूनच ब्रिटिश सरकारनें खास नेमलेले रा० सा० बर्वे कारभार पहात होते. या रावसाहेबांचें व शिवाजीमहाराजांच्या आओींचें कधींच पटलें नाहीं. नेहमीं खटके अुडावयाचे ! शिवाजी महाराज कोल्हापुरास आले आणि ते वेड आहेत असें "जाहीर" झालें. इतकेंच काय, पण वेडापायीं त्यांना "कोरड्याखालीं ओढण्यांत येतें" असा गवगवा जिकडे तिकडे झाला. यामुळें टिळक-आगरकरांनीं या घटनेंत लक्ष घातलें. १५ जाने-वारी १८७१ च्या मराठ्यांत महाराजांवरील अन्यायाला तोंड फोडण्यांत आलें. केसरीनेंही गर्जना सुरू केली. रा० ब० बर्वे खवळले. पुणेरी संपादकांना माहिती कोण पुरवीत असावा याचा विचार करतां, रा० ब० सदाशिव पांडुरंग तथा नाना भिडे आणि न्यायखात्यांतील बळवंतराव जोशी यांचा संशय आला. या मंडळींचा कल रा० ब० व रेसिडेंट यांचेपेक्षां शिवाजी महाराज नि राजमाता यांचेकडे झुकत असे. पैकीं जोशी टिळकांचे स्नेही. न्यू स्कूलचे सुपरिंटेंडेंट वामनराव आपटे हे कोल्हापुरासच वार लावून शिकलेले. हे सगळे धागे जमवून रा० ब० बर्वे यांनीं कयास बांधला कीं हेवा धरून हा सारा कट आपल्याविरुद्ध रचला गेला आहे. मग सालअखेर गव्हर्नरसाहेबांकडे केसरी-मराठ्यांवर दावा करण्यास परवाना मागितला. अेका अर्जानें भागलें नाहीं तसा दुसरा केला. अखेर परवानगी मिळाली. मुम्बईचे चीफ प्रेसिडेन्सी

मॅजिस्ट्रेटचे कोर्टांत टिळक, आगरकर व त्यांचे साथी यांचेवर खटला अुभा केला. पुरी चौकशी होअून १३ जुलै १८८२ रोजीं टिळक–आगरकरांना चार महिने साधी कैद झाली व अुभयतांना डोंगरीच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें.

## शिक्षा काटली—

या चार महिन्यांत टिळक–आगरकरांनीं आपले बेत, बेतांची जुळणी, आलेले अनुभव आणि पुढील आखणीची शहानिशा केली. याच चार महिन्यांत महाकवि शेक्स्पीअर याचें हॅम्लेट नाटक आगरकरांनीं भाषांतरिलें. भाषांतराचें नांव " विकार–विलसित. " याशिवाय, आपण कसे दिवस तुरुंगांत काढले याचा अहवाल अेक गमतीदार चोपडें लिहून आगरकरांनीं जनतेस दिला आहे. " डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे १०१ दिवस " हें त्या चोपड्याचें नांव. त्यांत आगरकर लिहितात—

> " कोल्हापूर प्रकरणाच्या संबंधानें लोकांच्या अटकळीचा जसा फजितवाडा उडाला तसा दुसऱ्यासंबंधानें कधींच उडाला नसेल. लोकांना वाटत होतें कीं, पत्रकर्ते निदान दंडावर तरी सुटतील; पण जज्जानें व ज्यूरींनीं त्यांची पच्चीच उडविली. पत्रकर्त्यांना मात्र अशी भुरळ कधींच पडली नव्हती ! ....कोर्टांत फिर्याद लागल्याबरोबर मराठा-केसरीचे दिवस भरले असें कित्येकांस वाटूं लागलें. पुढें शास्त्रीबुवांचा अकालीं मृत्यु आला. मग तर कांहीं पुसूच नका. या दोन दुःखांकडे आणि आणीबाणीच्या प्रसंगीं जिकडे तिकडे सर्वजण असें म्हणूं लागले कीं, ही मण्डळी आतां रसातळाला गेली म्हणून समजा ! असो. आम्ही असें समजतों कीं, येवढ्या थोड्या काळांत आम्हांवर जीं दोन संकटें येअून गेलीं व ज्यांतून आम्ही फाटाफूट झाल्याशिवाय जसेच्या तसे बाहेर पडलों त्यावरून आमच्या देशबंधूंची एवढी तरी खात्री झाली असेल कीं, देशसेवेचे दंभ करून चार पैसे मिळविण्यांत हे दंग झाले नाहींत, तर यापेक्षां थोडेसें कठिण काम अंगावर घेअून तें निश्चयानें तडीस नेण्याचा त्यांचा निर्धार झालेला आहे. "

### लोकादर वाढला--

टिळक-आगरकरांना शिक्षा झालेली ऐकतांच, त्यांचेविषयींचा लोकांच्या आदर शतगुणित झाला. ते तुरुंगांत असतांनाच डेक्कन कॉलेजा-तील वर्डस्वर्थ, न्यायमूर्ति मंडलिक यासारखे लोक सुटावेत अशी आपले सरकारपाशीं असलेलें वजन उपयोगांत आणून खटपट करीत होते. पण उपयोग झाला नाहीं. अखेर २६ आक्टोबर १८८२ रोजीं शिक्षेची मुदत संपून टिळक-आगरकर सुटले. लोकांनीं या दोन वीरांची मिरवणूक काढली व अनेकांनीं अनेक ठिकाणी पानसुपारीस बोलावून मानमरातब केला. तुरुंगांतून परत आलेले देशसेवक अशा गौरवानें लोकांनीं आदरणें हें त्या-वेळीं तरीं अपूर्व होतें.

जमीनीवर आपटलेला चेंडू उशी घेऊन अुसळतो तसे हे तरुण पुढारी आपली लोकसेवा नवीन जोमानें फिरून करू लागले. केसरीनें आयाळ झाडली आणि अधिक अवसानानें अन्यायावर तुटून पडण्यासाठीं आरोळी ठोकली.

### कमाल—

आपले वाढतें अवसान ओळखीत ओळखीत मुसमुसलेली कसरत करीत जसजसा केसरी पुढें चालला, तसतसा तो वजनदार होत चालला नि लोकांचा कलिजा बनला. न्यूस्कुलचीही वाढ अशीच मनोवेधक होती. मॅट्रीक्च्या यशाचें मान वाढतें राहिलें. तशीच जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिपची मिरासच जणूं या शाळेस मिळाली होती. मग आशा फुलून चालक मंडळींनीं सन १८८४ अखेर डेक्कन अेज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली व ता. २ जानेवारी १८८५ रोजी फर्ग्युसन कॉलेज अुघडलें. यानें मंडळीच्या लोक-सेवेस अेक नवीनच तेज आलें. फर्ग्युसन कॉलेजचें यश हें टिळक-आगरकरादि मंडळींच्या सहकाराची, संघटनेची आणि अेकदिलाची कमाल ठरली !!

### मतभेद—

लागेल ती झीज सोसून, आडवें येईल तें कापून काढून आपले नजरे-समोरील ध्येय गाठतां येईल असा दैनंदिन खटाटोप करीत असतांच

या तरुण देशसेवकांना शेवटीं मतभेदानें घेरलेंच ! देशांत दिवाळीची झालेली होळी टिळक–आगरकरांच्या मनाला जाळीत होती. ही होळी परवशतेच्या पायचेपीनें रचली गेली असा कयास करून तिला कुलगी करावी असा चंग लोकमत पाठीशीं घेऊन बांधावा, असा टिळकांचा कटाक्ष; तर उलट, दोन शतकांनीं तरी दिवाळीची मजा विनधोक भोगतां यावी यासाठीं लोकांत नवीन काळाचें पाणी मुरलें पाहिजे, अशी मीमांसा करून, लोकांचा रोष झाला तरीही अप्रिय पण पथ्यकर मसलत बेधडक देत रहावयाचें, अशासाठीं आगरकरांनीं कंबर कसली. लोकशिक्षणाच्या महाबळेश्वरावर एकेठिकाणीं आलेल्या कृष्णा व सावित्री कांहीं काळ अेकरूप वाहिल्या. पण पुढें त्यांस फाटे फुटले. आतां अेकाल्या राजकीय तर दुसऱ्याला सामाजिक वळण लागलें. हळूहळ हीं निराळीं वळणें इतकीं अंगवळणीं पडलीं कीं, शिक्षणासारख्या समान भूमिकेवर देखील दिलसाफ एकोपा होईना; खळखळाट होत राहिला. परिणामीं टिळक–आगरकर पांगले. आगरकरांना केसरी सोडावा लागला व १८८७ त टिळकांनीं केसरी–मराठा या दोनही समाचारपत्रांची जबाबदारी पतकरली. एकच साल गेलें आणि आगरकरांनीं "सुधारक" पत्र काढून आपलीं मतें लोकांस शिकवणेस सुरवात केली. पुढें फर्ग्युसन कॉलेजांतही मतभेदांचा जाच होऊं लागला व अखेर १८९० चे शेवटीं टिळकांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजिनामा दिला व आपले सारें लक्ष राज-कारणांत घातलें.

## झोड—

गोपाळ कृष्ण गोखले हे सुधारकांत आगरकरांचे जोडीदार होते. सुधारकांतील इंग्रजी रकाने गोखले संपादीत व आगरकर मराठी ! अनीति, अगर जुलूम यांचा वास कोठें आला रे आला कीं, सुधारक तेथें तुटून पडावयाचा. पण समाजांत रूढीची ओढ एवढी दणगट होती की "जुनें तें सोनें" धरून चालणारा लोकसमूह आगरकरांचा सुधारकी सडेतोडपणा सहन करूं शकला नाहीं ! इतका कीं आगरकरांची प्रेतयात्राच अेक शिमगा साधून, आगरकर जिवंत असतानाच त्यानें काढली ! ! पण याला कोण डरणार ? आगरकर ? "टाकांतून अर्थबोधक अक्षरें निघत आहेत आणि तीं वाचावयास

एक तरी वाचक मिळत आहे " तोंवर आपली सुधारणेची पताका फड-कवत राहावयाचेंच, हा आगरकरांचा बाणा होता. अशांत, टिळकांनीं परंपरेची वकिली केली. तशी दोघांची झडली. एकदां अशा थराला गेली कीं टिळकांनी आगरकरावर फिर्याद करावयाचें ठरवलें; पण न्यायमूर्ति रानडे मध्यें पडले आणि सारें जागचे जागींच मिटलें.

## सुधारकाचें अंतरंग—

सुधारकांतील लिखाण हेंच आगरकरांची करामत दाखवणारें लेखन होय. कालिदासाचीं अनेकानेक नाटकें आहेत; पण शाकुन्तल हें जसें कालि-दासाचें नांव अजरामर करतें, तसेंच सुधारकांतील चौफेर सामाजिक टीका-लेखांनीं आगरकरांचें नांव महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासांत अढळ केलें. " बुद्धिवाद " हा सुधारकांतील लेखांचा कणा आहे हरएक बारीक सारीक बाब देखील मेंदूच्या कसावर घासून बघावी; पटेल ती हाल करणारी वा झीज लावणारी असली तरी अंगिकारावी आणि न पटेल ती लोकवहिवाटींत असली अगर लोकांची लाडकी असली तरी बेलाशक झटकून टाकावी. अशी शिकवण महाराष्ट्राला आगरकरांचा सुधारक सतत सात वर्षे देत होता.

> " विश्वासावलंबी कल्पनांस आणि आचारांस विवेकाची आंच देऊन झाळून पाहणें हें सुधारकाच्या अनेक कर्तव्यांपैकीं अेक कर्तव्य होऊन बसतें... "

असें आगरकरांनीं सांगितलें असून सोवळें-ओवळें, सांडपाणी, देवदेवतांची खुळचट घडण, मुलांबरोबरीनें मुलीचें शिक्षण, केशवपन, हजामत, स्त्री-पुरुषांचे पेहराव, समतिवय, स्वयंवर, वल्लभोपासना, प्रियाराधन, अशासारखे अेरवी साधे दिसणारे विषय तर सुधारकांत आगरकरांनीं पिजून पिंजून लिहिलेच; पण आपला शिक्षकाचा पेशा नेटका सांभाळणारे आगरकरांचे आगरकरपण शिक्षणासंबंधीं सुधारकांत आलेलें लेखांत चटकन वाचकांसमोर अुभें राहतें. पुराण असोत, पण भारतीय कलांचा मोठेपणा विशेष आहे, हा आगरकरांचा अभिमान ही भारतीय कलासंबंधींचे लेखांतून चटकन नजरेस येतो. " इंग्रजी राज्याची उलटी बाजू अथवा आमचें घोर दारिद्य ", " अिंग्रजी राज्यांत पोटभर खावयास मिळत नाहीं " हे व असले

आगरकरांचे राजकीय लेख आणि अर्थशास्त्रावरील माहितीपूर्ण लेख पाहिले असतां, कोणीही कबूल करील कीं " इष्ट असेल तें बोलणार, आणि साध्य असेल तें करणार " हें आपलें व्रत आगरकरांनीं तंतोतंत अमलांत आणलें होतें.

## चढती वाढती पदवी—

सुधारकाचा असा संचार चालू असतांच न्यू स्कूल व फर्ग्यसन कॉलेजांतील शिक्षणाची जोपासनाही आगरकर मनोभावें करीतच होते. पुस्तकी ज्ञानाचें ठराविक रिंगण विद्यार्थ्यांनीं घेत रहावें, हें आगरकरांस खपणारें नव्हतेंच. कोणताही विषय शिकवतांना विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करावयास लावावयाचा नि होईल तितका त्यांचा मेंदू चेतवावयाचा हें आगरकरांचें धोरण होतें. याच धोरणामुळें व विद्यार्थीमंडळीवर ते आपल्याच मुलांसारखे लक्ष ठेवीत, यामुळेंही आगरकरांची सुधारकी मतें कोणाला आवडलीं नाहींत, तरी आगरकर बरीक सगळ्यांनाच आवडत. डेक्कन एज्युकेशन सोसायटींत ही आगरकरांविषयीं हाच आदर होता. म्हणूनच न्यू स्कूलमधील आरंभीं साधे शिक्षक असलेले आगरकर पुढें त्या शाळेचे सुपरिंटेंडंट झाले; आणि फर्ग्युसन् कॉलेजांत पंडीत असलेले आगरकर वामनराव आपटे—संस्कृत कोशकार यांच्या मागें फर्ग्युसन्चे प्रमुख बनले.

## अखेर—

फर्ग्युसन्चे प्रमुख आगरकर झाले खरे; पण वामनराव आपटे वारले आहेत, आपणही फार दिवस तग धरूं असा भरंवसा आगरकरांना लागेना. तरी वाढती जबाबदारी आगरकरांनीं पडू दिली नाहीं. काम येऊन पडलें आणि तें अुचलावयास दुसरें कोणी नाहीं, आपणच ओढानें उचललें पाहिजे, अशी वेळ आली तर जबाबदार माणसें मागें सरत नाहींत, कुचराई करीत नाहींत कीं कमकुवतपणाची सबब सांगत नाहींत. जीव लावून उचलेल तेवढा सारा बोजा उचलतात आणि साधेल तेवढा कामाचा उरक उठावानें करतात. आगरकरांनीं तेंच केलें. बी. ए. चा अभ्यास करीत असतांच, अनुवांशिक दमा आगरकरांना लागला होता. अनेक औषधें नि दुसरे उपाय करूनही तो आगरकरांना सोडून जाईना. अगदीं जिवाला भिडला तरी वामनराव आपट्यांची जागा आगरकरांनीं घेतली आणि फर्ग्युसन् कॉलेज माल-

कीच्या इमारतींत भरलेलें पाहिलें. तरी १८९५ च्या उन्हाळयांत आगरकरांची प्रकृति बरीच बिघडली. तशांतच फर्ग्युसन् मधील दुसरे एक सहकारी नि त्राटिका नाटकाचे लेखक वासुदेवराव केळकर कालवश झाले. ही हृदयाला पिळवटणारी बातमी अैकून आगरकर अधिकच खालावले. काळजापाशीं भिडलेला दमा निरुपाय ठरला आणि सोमवार ता. १७ जुन १८९५ रोजीं उजाडतां उजाडतां आगरकरांनीं या लोकाचा कायमचा निरोप घेतला !

## आगरकरानंतर—

गोपाळ गणेश आगरकर वारले, हें ऐकून महाराष्ट्र हळहळला, आगरकरांचा अनुयायी व नातेवाईक समाज कळवळला, आगरकरांचा शिष्यसमूह तळमळला. ह. भ. प. पांगारकरांसारखे सनातनी शिष्य रडले व बाळ गंगाधर टिळकांसारखे वेळेस दोन हात करावयास उभे राहिलेले धीराचे हिमालय गंगायमुना ढाळूं लागले.

## आगरकरांची थोरवी—

कारण आगरकरांची थोरवीच तशी होती. नामदार गोपाळ कृष्ण गोखले लिहितात—

> “ अेका थोर पुरुषानें शेवटची विश्रांति घेतली. त्यांच्या मृत्यूनें पुणें किंवा महाराष्ट्रच नव्हे तर सर्व देशाला दैन्य आलें... ...जन्मतःच मोठेपण मिळणें हें भाग्य थोर; पण मोठेपणा स्वतःच सपादन करणें हें अधिक थोर भाग्य. विद्वान् पंडित, कळकळीचा देशभक्त, निर्भय नि जोरदार शीलाचा असा थोर पुरुष म्हणजेच आगरकर! त्यांच्यासारखीं माणसें कित्येक वर्षांत एखादे वेळीच जन्माला येतात व म्हणूनच त्यांचा मृत्यु म्हणजे राष्ट्रीय आपत्ति होय. ”

आगरकरांचा एक विद्यार्थी सुधारकांत गुरुचरणीं सुमनें अुधळतांना लिहितो—

> “ कै. प्रिन्सिपॉलसाहेब, ज्या अज्ञान देशबांधवांसाठीं आपल्या कुटुम्बाची, मित्रांची, ज्ञातीची व प्रसंगीं त्या देशबन्धूंची इतराजी तुम्ही आनंदानें, खुषीनें, दृढनिश्चयानें सहन केली; तथापि त्यांना म्हणून सोडलें नाहीं; शत्रूही बोलणार नाहीं, असे शद्ब आपल्या निकट मित्रांनीं, सार्वजनिक रीत्या आपल्या-

वर टाकले तरी आपण डगमगला नाहीं; पतित मनुष्याची जी अवस्था करूं नये ती आपल्या मूर्ख विद्यार्थ्यांनीं व दुराग्रही प्रतिपक्षियांनीं पुण्यासारख्या शहरांत केली तरी त्या लोकांच्या हिताकडे आपण कधींही दुर्लक्ष केलें नाहीं; ज्या स्वार्थबुद्धीचा आपणांस जन्मांतरी स्पर्श झाला नाहीं तिचाच आरोप करण्यास जरी कोणी फारसे कचरले नाहींत तरी आपण त्या लोकांसच चिकटून राहिलात; दारिद्र्यावस्थेंत विद्याभ्यास करून तारुण्यावस्थेंत निष्कांचनतेच्या पदरीं जो पडला आणि हजारों रुपये प्राप्तीची सुन्दर आशा पुढें असतां ज्यानें तिला लाथाडलें, त्याची निरपेक्षता किती असेल ? ज्यानें आपल्या विचारांची दिशा थोडी तरी बदलली असती, तरी लोकांनीं प्रीतीनें मेहेरनजर दाखवली असती; अशा परिस्थितींतही ज्यानें मनाला चांगलें वाटेल तेंच लिहून व करून कांहीं काळ तरी समाजद्वेष संपादून स्वसुखावर पाणी सोडलें, त्याची लोकहितैकनिष्ठा किती तीव्र असेल बरें !"

आगरकरांविषयीं वरील सारखे आलाप त्यांच्या मरणाबरोबर निघाले एवढेंच नव्हे; तर १९१६ साली आगरकरांची पंचविसावी पुण्यतिथी झाली, त्यावेळीं लोकमान्य बाळ गंगाधर टिळकानींही आगरकरांची थोरवी पुढील सारखी गाईली:—

"देशी वर्तमानपत्रास हल्लीं जर कांही महत्व आलें असेल तर तें बऱ्याच अंशीं आगरकर यांच्या विद्वतेचें व मार्मिकतेचें फळ आहे यांत शंका नाहीं. सन १८८८ सालापर्यंत केसरींत जे राजकीय विषयांवर लेख आले आहेत ते बहुतेक आगरकरांचे आहेत. या सर्वांचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां असें दिसून येते कीं, आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते.... जो तार्किकपणा समाजसुधारणेंसबंधानें त्यांच्या अंगीं वसत होता, तोच तार्किकपणा त्यांनीं राजकीय बाबीवरील आपल्या लेखांतही पूर्णपणें उपयोगांत आणला आहे....आपल्या कर्तबगारीनें व्यावहारीक उन्नति आपण करून घेऊं असा निश्चित भरवसा असतां, मनोदेवतेस साक्ष ठेवून संकटें, विपत्ति, हालअपेष्टा सोसूनही मी आपलें देशकार्याचें मनोगत पार पाडीन असें म्हणणारे आगरकरांसारखे पुरूषच खरे धीर होत."

IRBK-0102015

IRBK-0102015

# बालवाङ्मय

★

मुलांसाठीं फुलें
—साने गुरुजी

वेडा भाऊ
पवित्र पाणी
—के. नारखेडे

माया बाजार
रशियन बालकथा
—दा. पां. रानडे

राणीचा रत्नहार
—सौ. प्रभा जोशी

भाग्यवान दौलती
—शं. रा. देवळे

चार पंडीत
—यदुनाथ थत्ते

दोन धाडसी
चिवचिव राजा
—श्री. केळकर

किंमत प्रत्येकीं ४ आणे

प्रकाशक
द. र. कोपर्डेकर, पुणें २.